# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अभिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**


(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./ ३०४ /२०१६
दिनांक : १४/ ०६/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:– शाळेत व कॉलेज मधील मुले गैरहजर राहिल्याची माहिती मुलांच्या पालकांना मोबाईलवर एस. एम.एस द्वारे देण्याबाबत

सदंर्भ:– १) मा. शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क. उशिसं२०१६/गैरहजरी एसएमएस /मवि–१/६४९० दि. २४ मे. २०१६
२) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई क. २/एनजीसी/संकीर्ण २/२०१६ /२०८दि. १२.२.२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, महाविद्यालया मधील काही विद्यार्थी/विद्यार्थींनी सातत्याने तासिकांना गैरहजर राहतात त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्याकरिता मा. प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या गैरहजेरीबाबतची माहिती त्यांना व त्यांच्या पालकांना कळविण्यात यावी. (पत्राद्वारे, एस.एम.एस व ई मेलद्वारे) की जेणेकरून विद्यार्थी व महाविद्यालयाचे हित साधल्या जाईल. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही व पालक, विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक एकमेकांच्या संपर्कात राहतील

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतीलिपी व माहितीस्तव सादर**

१) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. मध्यवर्ती इमारत, पुणे–१
२) मा. प्रधान सचिव, उ.शि.विभाग, मत्रांलय विस्तार भवन, मुंबई–३२

जाजवाना विद्यान ...
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 419 दिनांक 26/5/16
जावक क्र. ........ दिनांक ........

आवक 2586 25/5/16
जावक क्र. ........

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१


Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१६/ गैरहजेरी sms /मवि-१ /६४६०

दिनांक- २३/०५/२०१६
24 MAY 2016

प्रति,

१) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- शाळा व महाविद्यालयातील गैरहजर पाल्यांची माहिती पालकांना भ्रमणध्वनीवर एसएमएस द्वारे देण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन पत्र क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.१२८/ म.शि.-५, दि.०७.०४.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय शासन पत्रासोबत श्री.योगेश केणी , महाराष्ट्र अध्यक्ष, भ्रष्टाचार एवं अपराध निवारक परिषद , मुंबई यांचे मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेल्या पत्राची प्रत देण्यात आलेली आहे.(प्रत संलग्न)

सदर पत्रात त्यांनी शाळा महाविद्यालयांमधील मुले ही शिक्षकांची दिशाभूल करून गैरहजर राहतात. शिक्षकांना वाटते की मुले घरी आहेत आणि पालकांना वाटते की मुले शाळा / महाविद्यालयांत आहेत. परंतु ही मुले लेक्चर चुकवून फिरावयास जातात. त्यामुळे मुलांच्या अभ्यासाचे नुकसान होते. शाळा / महाविद्यालयांत मुले गैरहजर राहिल्यास त्याची माहिती पालकांच्या मोबाईलवर एसएमएस द्वारे देण्याची मागणी केलेली आहे. अशा प्रकारे माहिती दिल्यास मुलांना पालकांची व शिक्षकांची दिशाभूल करणे शक्य होणार नाही तसेच पालक व शिक्षक एकमेकांच्या संपर्कात राहतील असे त्यांनी नमूद केलेले आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपले अभिप्राय तात्काळ संचालनालयास सादर करावेत.

डॉ. रोडे समोर
25/05/16

(डॉ.व्ही. आर. मोरे )
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Fr 3 Feb 2015/Letter 2015-16/letter

219

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
13 APR 2016
आवक क्रमांक:- ८E५७
शाखा:- म.वि. ९

महाराष्ट्र शासन
क्रमांक: संकीर्ण २०१६ /प्र.क्र.१२८/म.शि.५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
दालन क्रमांक : ४१६, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी विस्तार क्र.३१७१.
दिनांक:- ०७ एप्रिल, २०१६.

प्रति,

संचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- शाळा व महाविद्यालयातील गैरहजर पाल्यांची माहिती पालकांना भ्रमणध्वनीवर एसएमएस द्वारे देण्याबाबत

उपरोक्त विषयावरील, श्री.योगेश केणी, महाराष्ट्र अध्यक्ष, भ्रष्टाचार एवं अपराध निवारक परिषद, मुंबई यांचे क्रमांक AC/CPC/MH/५०९/२०१६, दिनांक ०२/०१/२०१६ चे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले व त्यांच्या कार्यालयातुन प्राप्त झालेले पत्र सोबत जोडले आहे. सदर पत्रास अनुसरुन, आपल्या स्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(बा.म.आसोले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:
कार्यासन/ म.शि. ५, संग्रहार्थ.

13/4

श्री. चोगुले
13/4

।। सत्यमेव जयते ।।

# भ्रष्टाचार एवं अपराध निवारक परिषद
# Anti-Corruption & Crime Preventive Council

Regd. No. DR/GGN/63

**Head Office** : Vill. & P. O. Bhaghanki, Tehsil & District, Gurgaon, Haryana, India.
**Head Office** : Chamber No. 15, Ground Floor, New Lawyer's Chambers Block, Opp. Supreme Court, New Delhi - 110 001.
**Correspondence Off.**: B-3/1, Mahindra Nagar, Dayabhai Patel Road, Malad (E), Mumbai - 400 097.
**Tel.**: 4003 7249 • Email. mohan.krishnan.naccpc@gmail.com • www.naccpc.com

SHRI. R. D. UPADHYAY
Advocate - Supreme Court
Chief Legal Advisor

SHRI YOGESH KENY
Maharashtra – President

MOHAN KRISHNAN
President - All India

Add. For Correspondance :- 123, keny house, Bhandarwada, Pannalal Gosh Marg, Malad west, Mumbai 64,
Mob. 09892961494, Email:- keny.yogesh123@gmail.com, web side:- www.naccpc.com

**Ref. No.. AC/CPC/MH/509/2016**

**Date.. 02/01/2016**

मुख्य सचिवांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक 18/1/16
क्र. 1429011

प्रति,

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई 32

विषय :- शाळेत व् कॉलेज मधील मुले ही गैर हजेर राहिल्याची माहिती मुलाच्या पालकाना मोबाइलवर एस.एम.एस. द्वारे देण्याबाबत.

माननीय महोदय,

यांस कळविण्यात येते की, शाळेत व कॉलेज मधील मुले ही शाळेतील शिक्षकांची दिशाभूल करून गैर हजर राहतात. शिक्षकांना वाटते की मुले ही घरी आहेत. आणि मुलांच्या पालकाना वाटते की माझी मुले ही शाळेत / कॉलेज मध्ये आहेत. परंतु मुले ही लेक्चर बंग करून फिरावायस जातात. व एखाद्या वेळी मित्राला मामा किवा काका बनवून शिक्षकांच्या समोर उभे करतात. त्यामुळे मुलांच्या अभ्यासाचे नुकसान होते. तसेच मुले ही शिक्षकांची आणि पालकाची फसवणूक करतात. जर मुले ही शाळेत व कॉलेजमध्ये गैरहजर राहिल्यास त्याची माहिती पालकांच्या मोबाइल वर एस.एम.एस. द्वारे दिल्यास मुलाना, पालकांची व शिक्षकांची दिशाभूल करने शक्य होणार नाही. तसेच शिक्षक व पालक ऐकमेकांच्या संपर्कात राहतील.

त्यामुळे आपणास विनंती करण्यात येते की, शाळेत व् कॉलेज मधील मुले ही गैर हजर राहिल्याची माहिती मुलाच्या पालकांना मोबाइलवर एस.एम.एस. द्वारे द्यावी. धन्यवाद।

D.S. (B)
D.S. (P)

आपला नम्र

योगेश केणी
(महाराष्ट्र अध्यक्ष)

प्र.स./शा.शि.
प्र.स./उ.व.तं.शि.

14 30.1.16